मंगळवार दि. ०४ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३३४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# नागरिकांना केंद्र बिंदू ठेवून महसूल विभागाने काम करणे आवश्यक - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना - प्रतिनिधी**

महसूल विभागाने आपल्या प्रत्येक कामामध्ये नागरिकांना केंद्रबिंदू मानून पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख सेवा देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित महसुल दिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, सहायक जिल्हाधिकारी आर रंगमंजु, निवासी उपजिल्हाधिकारी शशीकांत हदगल, अतिरिक्त पोलीस अधिक्षक विक्रम साळी, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, उप विभागीय अधिकारी रामदास दौंड, पद्माकर गायकवाड, उमाकांत पारधी, रामेश्वर रोडगे, जिल्हा नियोजन अधिकारी सूचित कुलकर्णी, तहसीदार नायब तहसीदार संघटनेचे अध्यक्ष रमेश पागोटे, राज्य सरकार कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष पी.बी. मते, महसुल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र शिंदे, महाराष्ट्र राज्य तलाठी संघाचे अध्यक्ष संदीप नरुटे, लघुलेखक संघटनेचे अध्यक्ष योगेश वाघ, वाहन चालक संघटनेचे अध्यक्ष योगेश कुरेवाड, महसुल चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष शाम विभुते, महसुल सेवक संघटनेचे अध्यक्ष संदीप धारे, पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अर्जून ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या



की, महसुल विभाग कोणतीही समस्या किंवा परिस्थितीमध्ये आपले कर्तव्य पार पाडण्याकरीता सदैव उभा राहतो. महसूल विभाग हा शासनाच्या प्रशासनाचा कणा असून नागरिकांना विविध शासकीय सेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यात या विभागाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. मागील एक वर्षात महसुल विभागाने पुर परिस्थिती यशस्वीपणे हाताळली, पारदर्शकपणे पोलीस पाटील भरती प्रक्रिया पार पाडली, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, विविध निवडणूका, जनगणना, एसआयआर आदी कामे यशस्वीपणे पार पाडली. याकरीता मी सर्व महसुल अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करते. सद्यपरिस्थितीत आपले काम वाढलेले आहे. परंतु आपण आपले कुटूंब आणि काम यामध्ये समतोल राखुन कर्तव्य पार पाडणे आवश्यक आहे. यापुढेही आपण चांगले काम करु. यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ म्हणाले की, महसूल विभाग केवळ जमीन व महसुलाशी संबंधित कामकाजापुरता मर्यादित नसून आपत्ती व्यवस्थापन, निवडणुका, नैसर्गिक संकटांतील मदत, विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी, तसेच नागरिकांना वेळेत आणि पारदर्शक सेवा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडतो. महसूल विभागाने संवेदनशीलता, पारदर्शकता या तत्त्वांवर काम करून नागरिकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी कटिबद्ध रहावे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी राजेंद्र शिंदे, महेंद्र गिरगे यांनी भाषण तसेच उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांनी समायोचित मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकात निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी, महसुल विभागाने मागील एक वर्षात पार पाडलेल्या विविध उल्लेखनीय कामाचे सादरीकरण करुन महसुल दिनाचे महत्व सांगितले.

यावेळी कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांचा तसेच त्यांच्या गुणवंत *(पान २ वर)*

## चंदनझिरा परिसरात खंजीर घेऊन दहशत माजविणाऱ्यावर पोलिसांचा धडक कारवाई; धारदार खंजीर जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील चंदनझिरा परिसरात हातात धारदार खंजीर घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका तरुणाला चंदनझिरा पोलिसांनी सोमवारी दुपारी सापळा रचून ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक धारदार लोखंडी खंजीर जप्त करण्यात आला असून, त्याच्याविरुद्ध शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नव्याने पदभार स्वीकारलेल्या पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी गुन्हेगारीविरोधात सुरू केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांना सोमवारी (३ ऑगस्ट) दुपारच्या सुमारास गुप्त खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, चंदनझिरा परिसरात एक इसम हातात धारदार खंजीर घेऊन फिरत असून नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करीत आहे. माहितीची खातरजमा करून त्यांनी तातडीने विशेष पथक घटनास्थळी रवाना केले.

रोहिदास मंदिर परिसरात कारवाई

पोलीस पथकाने दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास रोहिदास मंदिर, चंदनझिरा परिसरात सापळा रचला. तेथे सचिन परमेश्वर खरात (वय २६, रा. अशोक चौक, चंदनझिरा, जालना) हा संशयास्पदरीत्या फिरताना आढळून आला. पोलिसांनी त्याला *(पान २ वर)*

शिक्षकांची रिक्त पदे, मोडकळीस आलेल्या इमारती, वर्गखोल्यांचा व स्वच्छतागृहांचा अभाव

## जालना मनपा शाळांचा भोंगळ कारभार राज्य बाल हक्क आयोगाच्या रडारवर

### अध्यक्ष, सचिवांसह उच्चस्तरीय पथक ७ ऑगस्टला प्रत्यक्ष पाहणीसाठी येणार

**जालना - प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेच्या शाळांमधील गंभीर अनागोंदी, शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे, विद्यार्थ्यांना अपुऱ्या मूलभूत सुविधा आणि दर्जाहीन शिक्षणाच्या तक्रारींची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेतली असून, येत्या ७ ऑगस्ट रोजी आयोगाचे अध्यक्ष, सदस्य व सचिव स्वतः जालन्यात येऊन सर्व परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. त्यामुळे मनपा प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले असून शिक्षण व्यवस्थेतील *(पान २ वर)*

**७ ऑगस्टला थेट पाहणी – सदस्य डॉ. संजय लाखेपाटील**



महापालिका आयुक्त, सहआयुक्त (शिक्षण), शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) तसेच शहर अभियंता यांना महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने नोटिसा बजावल्या आहेत. दि. ७ ऑगस्ट रोजी मागील सुनावणीतील आदेशांची पूर्तता, सादर केलेल्या अहवालाची पडताळणी आणि महानगरपालिका हद्दीतील शाळांची प्रत्यक्ष पाहणी आयोगाकडून करण्यात येणार आहे. शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे, इमारतींची अवस्था, स्वच्छतागृहे, वर्गखोल्या व विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधांचा सखोल आढावा घेतला जाणार असल्याची माहिती डॉ. संजय लाखेपाटील, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी दिली. आयोगाच्या या कारवाईमुळे मनपा शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

# पावसाच्या पाहणीत नगरसेविकेच्या नातेवाईकाची सक्रिय भूमिका चर्चेत

## आयुक्तांच्या परिपत्रकाची पहिलीच परीक्षा?





**जालना - प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिकेच्या कामकाजात नगरसेवक व नगरसेविकांच्या नातेवाईकांकडून होणाऱ्या हस्तक्षेपाला आळा घालण्यासाठी आयुक्त अंजली शर्मा (भा.प्र.से.) यांनी नुकतेच कठोर परिपत्रक जारी केले असतानाच, त्याच परिपत्रकाच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी घटना समोर आली आहे. मुसळधार पावसामुळे प्रभाग क्रमांक १६ मधील भक्तेश्वर नगर व सिद्धार्थ नगर परिसरात अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरून नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या भागाची पाहणी करण्यासाठी नगरसेवक अमोल ठाकूर यांच्यासह किशोर पांगारकर यांनी भेट दिली.

मात्र, किशोर पांगारकर हे संबंधित प्रभागातील निवडून आलेले नगरसेवक नसून नगरसेविका उषा पांगारकर यांचे नातेवाईक असल्याने त्यांच्या सहभागावर आणि नागरिकांना दिलेल्या आश्वासनांवर आता प्रश्न उपस्थित होत आहेत.

आयुक्तांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार महानगरपालिका मुख्यालय, प्रभाग कार्यालये आणि विकासकामांच्या ठिकाणी नगरसेवकांचे पती, पत्नी, मुले, वडील, भाऊ किंवा इतर नातेवाईक यांनी प्रशासकीय कामकाजात हस्तक्षेप करू नये. अधिकारी-कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मौखिक किंवा लेखी सूचनांचे पालन करू नये, तसेच त्यांच्यावर कोणताही प्रशासकीय निर्णय आधारित असू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय काही व्यक्ती स्वतःला नगरसेवक असल्याचा भास निर्माण करतात, अधिकाऱ्यांना सूचना देतात किंवा सार्वजनिक ठिकाणी नगरसेवक म्हणून वावरत असल्याचे प्रकार प्रशासनाच्या निदर्शनास आल्याचेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

रविवारी झालेल्या मुसळधार पावसानंतर प्रभाग क्रमांक १६ मधील भक्तेश्वर नगर आणि सिद्धार्थ नगर परिसरातील अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले. नागरिकांचे नुकसान झाल्यानंतर परिसराची पाहणी करण्यासाठी नगरसेवक अमोल ठाकूर यांच्यासह किशोर पांगारकर यांनी भेट दिली. स्थानिक नागरिकांशी संवाद साधत अडचणी जाणून घेण्यात आल्या आणि आवश्यक उपाययोजना करण्याबाबत आश्वासन देण्यात आले.महापालिकेच्या नोंदीनुसार या प्रभागाचे निवडून आलेले सदस्य अमोल ठाकूर, उषा पांगारकर, निखील पगारे आणि दर्शना खोतकर आहेत. किशोर पांगारकर हे निवडून आलेले नगरसेवक नसून नगरसेविका उषा पांगारकर यांचे नातेवाईक असल्याचे सांगितले जाते. नगरसेविका उषा पांगारकर यांचे नातेवाईक असलेले किशोर पांगारकर यांनी नागरिकांशी अधिकृत लोकप्रतिनिधीप्रमाणे संवाद साधून आश्वासने दिल्याचा आरोप होत असून, हा प्रकार आयुक्तांच्या परिपत्रकाच्या भावनेशी विसंगत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

या घटनेत किशोर पांगारकर यांनी नेमकी कोणती अधिकृत भूमिका पार पाडली, त्यांनी पाहणीत सहभाग का घेतला? याबाबत अधिकृत स्पष्टीकरण अद्याप समोर आलेले नाही. त्यामुळे ही घटना आयुक्तांच्या परिपत्रकाच्या चौकटीत कशी पाहिली जाणार, याकडे लक्ष लागले आहे. प्रशासनाने स्वतः जारी केलेल्या परिपत्रकातील निर्देशांचा या प्रकरणात कसा अर्थ लावला जाईल आणि त्याबाबत कोणती भूमिका घेतली जाईल, हे महत्त्वाचे ठरणार आहे. महापालिकेने परिपत्रकात अशा प्रकारच्या हस्तक्षेपामुळे प्रशासनाची प्रतिमा मलिन होऊ शकते तसेच गरज भासल्यास कायदेशीर कारवाईही होऊ शकते, असे नमूद केले आहे.

त्यामुळे प्रभाग १६ मधील घटनेची प्रशासनाकडून दखल घेतली जाणार का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. या प्रकरणात किशोर पांगारकर, नगरसेविका उषा पांगारकर तसेच महापालिका आयुक्त अंजली शर्मा यांची अधिकृत भूमिका अद्याप उपलब्ध झालेली नाही. त्यांची प्रतिक्रिया प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणाचे संपूर्ण चित्र अधिक स्पष्ट होऊ शकते.

## एमआयडीसीतील लुटमारीप्रकरणी तपासातून गुन्ह्यातील ३८ हजारांची रोकड हस्तगत



**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील एमआयडीसी परिसरात २९ जुलै २०२६ रोजी झालेल्या जबरी लुटमारीच्या गुन्ह्यातील तिन्ही आरोपींना न्यायालयाने दोन दिवसांची वाढीव पोलीस कोठडी (पीसीआर) मंजूर केली असून, या कालावधीत चंदनझिरा पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात चोरलेली एकूण ३८ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात यश मिळविले आहे. तसेच आरोपींकडून उर्वरित मुद्देमाल हस्तगत करण्यासाठी आणि त्यांनी शहरात इतरही लुटमारीचे गुन्हे केले आहेत का, याचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणात सचिन कैलास गायकवाड ऊर्फ रावण (वय २३, रा. एकता चौक, चंदनझिरा), राणोबा ऊर्फ राणा भिकाजी तरकसे (वय २७, रा. कन्हैय्यानगर, जालना) आणि कर्ण कृष्णा पवार (वय २५, रा. सिंधी काळेगाव, ता. जि. जालना) या तिघांना चंदनझिरा पोलिसांनी यापूर्वीच अटक केली होती. आरोपींकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली स्विफ्ट कारही जप्त करण्यात आली होती. दरम्यान, पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी चंदनझिरा पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर या गुन्ह्याचा तपास अधिक गतीने व सखोलपणे सुरू केला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी आरोपींची कसून चौकशी केली असता, गुन्ह्यात लुटलेली रोख रक्कम तसेच पीडिताकडून फोन-पे () द्वारे बळजबरीने हस्तांतरित करून घेतलेली रक्कम मिळून एकूण ३८ हजार रुपये आरोपींच्या राहत्या परिसरातून जप्त करण्यात आले. गंभीर गुन्ह्यांची पार्श्वभूमी

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेले तिन्ही आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्यांच्याविरोधात दरोडा, दरोड्याचा प्रयत्न, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी आणि लुटमार यांसारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल आहेत. त्यामुळे अधिक तपासासाठी *(पान २ वर)*

# संपादकीय...

## वीजपुरवठा हा अधिकार; तो दबावानंतर नव्हे, जबाबदारीने मिळालाच पाहिजे

घनसावंगी तालुक्यातील विरेगावसह दहा गावांचा वीजपुरवठा अचानक खंडित होणे आणि त्यानंतर माध्यमांमध्ये बातमी प्रसिद्ध होताच काही तासांत तो पूर्ववत होणे, हा केवळ एका रात्रीचा घटनाक्रम नाही. तो ग्रामीण भागातील वीज व्यवस्थेतील त्रुटी, प्रशासनाची कार्यपद्धती आणि लोकशाहीतील माध्यमांच्या भूमिकेवर प्रकाश टाकणारा प्रसंग आहे. जर ग्रामस्थांचा दावा खरा असेल आणि मीटर कनेक्शनची संख्या कमी असल्यामुळे संपूर्ण गावांचा वीजपुरवठा बंद करण्यात आला असेल, तर हा अत्यंत गंभीर विषय आहे. कारण वीज ही आज केवळ सुविधा राहिलेली नाही; ती शिक्षण, आरोग्य, शेती, पाणीपुरवठा, उद्योग आणि दैनंदिन जीवनाचा मूलभूत आधार बनली आहे. त्यामुळे काही प्रशासकीय कारणांमुळे संपूर्ण गावाला अंधारात ठेवणे हा उपाय ठरू शकत नाही. प्रशासनाच्या निर्णयांमध्ये ''सामूहिक शिक्षा'' हा दृष्टिकोन असू नये. जर काही ग्राहकांनी मीटर घेतले नसतील किंवा तांत्रिक निकष पूर्ण होत नसतील, तर त्यासाठी संबंधितांवर नियमानुसार कारवाई करता येते. मात्र नियमित वीजबिल भरणाऱ्या शेकडो ग्राहकांनाही त्याची शिक्षा मिळणे न्याय्य ठरत नाही. प्रशासनाचा उद्देश सेवा देणे असतो, सेवा रोखणे नव्हे. या घटनेतील सर्वात सकारात्मक बाब म्हणजे माध्यमांनी या प्रश्नाची तत्काळ दखल घेतली. वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित यंत्रणा सक्रिय झाली आणि रात्रीच वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. यावरून माध्यमे केवळ बातम्या देणारी संस्था नसून लोक आणि प्रशासन यांच्यातील प्रभावी दुवा असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले. लोकांच्या समस्या योग्य पद्धतीने मांडल्या गेल्यास त्यावर प्रशासनाला प्रतिसाद द्यावाच लागतो, हे या घटनेने दाखवून दिले.

मात्र याच घटनेत एक अस्वस्थ करणारा प्रश्नही आहे. जर वीजपुरवठा इतक्या कमी वेळात सुरू होऊ शकत होता, तर तो आधीच का बंद करण्यात आला? आणि जर तांत्रिक अथवा प्रशासकीय अडचण होती, तर त्याबाबत नागरिकांना पूर्वसूचना का देण्यात आली नाही? आजच्या डिजिटल युगात एसएमएस, व्हॉट्सअॅप, सोशल मीडिया, ग्रामपंचायत किंवा स्थानिक प्रतिनिधींच्या माध्यमातून नागरिकांना माहिती देणे अजिबात कठीण नाही. महावितरणसारख्या सार्वजनिक सेवा देणाऱ्या संस्थेकडून केवळ तांत्रिक कार्यक्षमतेची नव्हे, तर संवादक्षमतेचीही अपेक्षा असते. नागरिकांना माहिती दिली, कारण स्पष्ट केले आणि समस्येच्या निराकरणाची वेळ सांगितली, तर अनेक वाद निर्माणच होणार नाहीत. या प्रकरणात महावितरणची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे सत्य परिस्थिती काय होती, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. जर ग्रामस्थांचा दावा चुकीचा असेल, तर महावितरणने वस्तुस्थिती मांडावी. आणि जर दावा योग्य असेल, तर भविष्यात अशी वेळ पुन्हा येणार नाही, यासाठी ठोस धोरण जाहीर करावे. ग्रामीण भागातील वीजपुरवठा हा विकासाचा कणा आहे. शेती, पिण्याचे पाणी, शाळा, आरोग्य केंद्रे आणि लघुउद्योग यांचे चक्र अखंड सुरू राहण्यासाठी विश्वासार्ह वीजपुरवठा अत्यावश्यक आहे. त्यामुळे अशा घटनांकडे केवळ ''एक दिवसाचा तांत्रिक बिघाड'' म्हणून पाहून चालणार नाही. या संपूर्ण घटनेने दोन गोष्टी अधोरेखित केल्या आहेत. एक म्हणजे जबाबदार माध्यमे लोकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी भूमिका बजावू शकतात. दुसरी म्हणजे सार्वजनिक सेवा देणाऱ्या यंत्रणांनी समस्या उभी राहिल्यानंतर नव्हे, तर ती निर्माण होण्यापूर्वीच संवाद, नियोजन आणि पारदर्शकतेवर भर दिला पाहिजे. लोकांचा विश्वास जिंकायचा असेल, तर प्रशासनाने ''तक्रार आली म्हणून कारवाई'' या मानसिकतेतून बाहेर पडून ''समस्या होऊच नये'' या दृष्टिकोनाने काम करणे ही काळाची गरज आहे. कारण वीज ही उपकाराची बाब नाही, ती प्रत्येक नागरिकाला वेळेवर आणि विश्वासार्ह पद्धतीने मिळणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे.

# सरकारचे ईपीएस-९५ पेंशन धारकांवरील दुर्लक्ष म्हणजे जेष्ठ नागरिकांची खुली थट्टाच!

२०१४ पासुन ईपीएस पेंशन धारक फक्त जगण्याइतकी इतकी पेन्शनची मागणी करीत आहे.परंतु सरकार प्रत्येक अधिवेशनात डोळे बंद करून फक्त तमाशा पहात आहे.जेष्ठ नागरिक ईपीएस पेंशन धारक कमीत कमी ७५०० पेंशन व महागाई भत्ता मिळावा यासाठी वृध्दापकाळात सुध्दा संघर्ष करीत आहे.परंतु सरकारच्या नाकावरील माशी सुद्धा उडतांना दिसत नाही हे जेष्ठांच्या प्रती दुर्भाग्य म्हणावे लागेल.सरकार निवडणुकीच्या काळात मतदारांना लॉलीपॉप देवून अनेक मोफत योजना अंमलात आणते.परंतु देशाचा शिल्पकार कामगार वर्ग फक्त जगण्याइतकी पेन्शनची मागणी करते तेव्हा सरकार प्रत्येक अधिवेशनात पाठ फिरवितांना दिसते.देशात वाढती महागाई,वाढता औषधोपचार, वाढते कर आणि वाढत्या प्रदूषणामुळे वृध्दापकाळातील ढासळते आरोग्य यांनी ईपीएस-९५ पेंशन धारक अत्यंत त्रासलेला असुन ग्रस्त आहे.कारण अल्पशा पेंशनमध्ये पेन्शन धारक कोणतेही काम पूर्ण करूच शकत नाही.यावर सरकारने कानांवर हात ठेवले आहे व तोंडावर बोट ठेवले आहे यावरून स्पष्ट होते की, सरकारला ईपीएस ९५ पेंशन धारकांशी काहीही देणेघेणे नाही.त्यामुळे सरकारला विनंती आहे की,आपण जर या गंभीर समस्येवर तोडगा काढूच शकत नसेल तर स्वेच्छा मरणाची परवानगी दिली पाहिजे.याचे स्वागत आम्ही ईपीएस पेंशन धारक आनंदाने करू. गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे.यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले.सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री ,खासदार,आमदार, प्रशासकीय विभाग यांना निवेदनाच्या माध्यमातून सरकारपर्यत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले.त्यामुळे या पावसाळी अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील करोडो वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही पावसाळी अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब आहे.अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरूच आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दुःख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही.ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे.केंद्र सरकार मोठमोठ्या गोष्टी करत आहेत परंतु वृध्दांकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे.ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल या आशेने आतापर्यंत उम्मीद टीकुन होती.परंतु सरकार मिनिमम पेंशन बद्दल एकही शब्द बोलायला तयार नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत,मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या पावसाळी अधिवेशनात दिसून आले.आज देशातील करोडो ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.सरकार महागाई वाढवीते तेव्हा कोणाचाही विचार न करता भरमसाठ महागाई वाढविते आणि ईपीएस पेंशन धारक फक्त ७५०० रूपये पेन्शन मागते तेव्हा सरकार पाठ फिरविते ही कुठली लोकशाही म्हणावी.आज सरकारने महागाईचा मोठा डोंगर उभा केला आहे यात सर्वसामान्य व पेंशन धारक दबलेला आहे.यामुळे अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स,वाढती महागाई, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा १००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य सरकारला का दिसत नाही? सरकार एवढी निर्लज्ज का झाली?पेंशन धारकांची मागणी होती की, कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा मिळावी. परंतु वित्त मंत्री निर्मला सिताराम यांनी संपूर्ण ईपीएस-९५ पेंशन धारकांना निराश केल्याचे स्पष्ट दिसून येते आहे.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर, महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने या पावसाळी अधिवेशनात घेणे गरजेचे होते. परंतु सरकारने याला यत्किंचितही महत्व दिले नाही ही अत्यंत दुःखद बाब आहे. वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस- १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले.केंद्र सरकारने आतापर्यंत करोडो ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले होते. कारण पेन्शन ही त्यांच्या ''म्हारपणाची शीदोरी'' आहे. त्यामुळे पेन्शन हे ''जीवन-मरणाचे'' साधन सुध्दा आहे. याबाबदची सुध्दा सरकारने जान ठेवली नाही. सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता कोणत्याही योजनेअंतर्गत कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय आतातरी घ्यावा.आता पेन्शन धारकांच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.परंतु आज १४५ कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी करोडो पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा ''अरबो रूपया'' सरकारजवळ आहे हा पैसा सरकार ''लोकप्रतिनिधीच्या'' पगारासाठी,पेन्शनसाठी व इतरत्र वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना ''भिक'' दील्यासारखी पेंशन देत आहे. ही ''लोकशाहीला'' काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दु:ख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे.राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू असतात व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वाढले की राजकीय पुढाऱ्यांचे पगार व पेंशन वाढतात याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे.

परंतु आताही वेळ गेलेली नाही ''देर आज दुरूस्त आए'' ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले.तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते. पावसाळी अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.

परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली. ईपीएफओ चा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते.कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न करोडो पेन्शन धारकांपुढे उपस्थित होतो.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की ''आपलाच पैसा आपणच चोर''. त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्न आहे की ''जगावे की मरावे''अशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे.त्यामुळे सरकारने ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत. त्यामुळे पेन्शन धारकांना विश्वास आहे की ईपीएस-९५ पेन्शन धारकांचा प्रश्न अवश्य सुटेल.पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे.सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे.त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे. शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा ''शिल्पकार'' आहे याची जाण केंद्र सरकारने ठेवली पाहिजे.राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो.केंद्र सरकारने ज्याप्रमाणे आठव्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी दिली.त्याचप्रमाणे ईपीएस-९५ पेंशन बद्दल सरकारने ठोस निर्णय घेतला पाहिजे. मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत.

परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत पक्ष-विपक्षाच्या अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दाला गांभीर्याने घेऊन कमीत कमी ७५०० रूपये पेंशन जाहीर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या करोडो पेंशन धारकांना आहे.सरकारला यावर काहीच निर्णय घ्यायचा नसेल तर ईपीएस पेंशन धारकांना सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी याचेही आम्ही स्वागत करू.जय हिंद!जय भारत.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# पान १ व ४ वरुन...

### नागरिकांना केंद्र...

पाल्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महसूल विभागाच्या कार्याचा आढावा घेऊन सेवा वितरण अधिक परिणामकारक करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चंदनझिरा परिसरात खंजीर...

ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्या ताब्यातून एक धारदार लोखंडी खंजीर आढळून आला. पोलिसांनी तात्काळ खंजीर जप्त करून आरोपीला अटक केली.

गुन्हा दाखल; पुढील तपास सुरू या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक मारीयो स्कॉट यांच्या फिर्यादीवरून चंदनझिरा पोलीस ठाण्यात संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. आरोपीने हा खंजीर कोणत्या उद्देशाने बाळगला होता, तसेच त्याचा इतर कोणत्याही गुन्ह्यांशी संबंध आहे का, याचाही तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

गुन्हेगारीविरोधात पोलिसांची मोहीम चंदनझिरा पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी अवैध शस्त्रे बाळगणारे, दहशत माजविणारे आणि सराईत गुन्हेगारांविरुद्ध विशेष मोहीम सुरू केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. पथकाची कामगिरी

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलीस उपनिरीक्षक मारीयो स्कॉट, पोलीस हेड कॉन्स्टेबल राजेंद्र पवार, कृष्णा तंगे आणि पोलीस कॉन्स्टेबल सागर खैरे यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

### जालना मनपा...

त्रुटींचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सचिव (प्र.) वंदना जेने यांनी जालना महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्तांना याबाबत अधिकृत पत्र पाठविले आहे. या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे की, मनपा शाळांमधील ५८ शिक्षकांची रिक्त पदे, अनेक शाळांची जीर्ण अवस्था, वर्गखोल्यांचा व स्वच्छतागृहांचा अभाव तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळत नसल्याच्या तक्रारी आयोगाकडे प्राप्त झाल्या आहेत. या संपूर्ण प्रकरणावर आयोगासमोर नुकतीच सुनावणी झाली होती. त्या सुनावणीत आयोगाने मनपा प्रशासनाला सर्व शाळांची भौतिक स्थिती, आवश्यक दुरुस्ती, उपलब्ध सुविधा आणि उणिवांचा सविस्तर अहवाल छायाचित्रांसह एका महिन्यात सादर करण्याचे निर्देश दिले होते. तसेच जालना जिल्ह्यातील न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील विशेष समितीने केलेल्या प्रत्यक्ष पाहणीचा निरीक्षण अहवालही आयोगाकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. आयोगाने आपल्या पत्रात बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ आणि शिक्षणाचा हक्क () अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा स्पष्ट उल्लेख करत, शाळांची प्रत्यक्ष पाहणी करणे, बालकांच्या हक्कांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे आणि आवश्यक त्या सूचना देण्याचा आयोगाला कायदेशीर अधिकार असल्याचे नमूद केले आहे. याच पार्श्वभूमीवर ७ ऑगस्ट रोजी आयोगाचे अध्यक्ष, सदस्य आणि सचिव जालना दौऱ्यावर येणार असून महानगरपालिकेच्या विविध शाळांना भेटी देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करणार आहेत. विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या सुविधा, शिक्षकांची उपलब्धता, इमारतींची सुरक्षितता, स्वच्छता, शिक्षणाचा दर्जा आणि प्रशासनाची कार्यपद्धती याचा सखोल आढावा घेतला जाणार आहे. दरम्यान, आयोगाच्या या धडक कारवाईमुळे मनपा शिक्षण विभागात मोठी खळबळ उडाली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले शिक्षक भरतीचे प्रश्न, मोडकळीस आलेल्या शाळांच्या इमारती, अपुऱ्या वर्गखोल्या आणि विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवर आता निर्णायक कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शहरातील पालक, सामाजिक संघटना आणि शिक्षण क्षेत्रातील जाणकारांचे लक्ष आता ७ ऑगस्टच्या आयोगाच्या पाहणीकडे लागले असून, या दौऱ्यानंतर मनपा शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींवर कठोर निर्णय होणार का, याकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

### एमआयडीसीतील...

न्यायालयाकडून त्यांची दोन दिवसांची वाढीव पोलीस कोठडी मिळविण्यात आली आहे.

इतर गुन्ह्यांचाही शोध सुरू

वाढीव पोलीस कोठडीदरम्यान आरोपींकडून गुन्ह्यातील उर्वरित रक्कम आणि इतर मुद्देमाल हस्तगत करण्याचे प्रयत्न सुरू असून, जालना शहरात त्यांनी आणखी लुटमारीचे किंवा तत्सम स्वरूपाचे गुन्हे केले आहेत का, याचाही तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. पथकाची उल्लेखनीय कामगिरी

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या नेतृत्वाखाली मारीयो स्कॉट, मनसुब वेताळ, राजेंद्र ठाकुर, प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, शिवाजी जमधडे, राजेंद्र पवार, अभिजित वायकोस आणि सागर खैरे यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

### कलश स्थापनेने...

पार पडल्या. त्यामध्ये सौ. वंदना व अनूपजी डोंनगावकर परिवारास आचार्य श्री शांतिसागरजी महाराज कलश, छत्रभुज छाबडा, अजित व छाबडा, अनिल छाबडा परिवारास आचार्य श्री आर्यनंदीजी महाराज कलश, सौ. अनुजा व राजेंद्र भवरलाल काला परिवारास संत शिरोमणी आचार्य श्री विद्यासागरजी महाराज कलश, मुकेश साहूजी , सुजीत साहूजी, राजेंद्र साहूजी व बालचंद साहूजी परिवारास आचार्य श्री सन्मतिसागरजी महाराज कलश,नेमिराज साहूजी परिवारास उपाध्याय श्री जयभद्रजी महाराज कलश, सौ. अल्का व कमलाकर रणदीवे परिवारास ज्ञानदान कलशप्राप्तीचा मान मिळाला. कलशप्राप्त सर्व परिवारांचे उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात अभिनंदन करत त्यांच्या सातिशय पुण्याची अनुमोदना केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव मेहेत्रे यांनी केले तर नितीन जैन यांनी विधीवत कलश स्थापना विधी संपन्न केला. यावेळी सकल जैन समाज बंधू-भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## सिल्लोड-भोकरदन-धाड राष्ट्रीय महामार्गावरील कामाच्या तक्रारी संदर्भात माजी मंत्री सत्तारांनी बोलावली प्राधिकरण अधिकाऱ्यांची बैठक

**भोकरदन – प्रतिनिधी**

सिल्लोड – भोकरदन – धाड या राष्ट्रीय महामार्गावर मुख्य रस्त्यावर भेगा पडल्याची उच्चस्तरीय चौकशी करत दोषींवर कारवाई करावी व तातडीने रस्ता दुरुस्ती करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस युवकचे तालुकाध्यक्ष प्रा डॉ अंकुश जाधव यांनी सिल्लोड येथे माजी मंत्री तथा आ. अब्दुल सत्तार यांची भेट घेऊन केली होती. दरम्यान, माजी मंत्री सत्तार यांनी तात्काळ दखल घेऊन मंगळवारी ४ ऑगस्ट रोजी मुंबई येथे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. तब्बल ३३६ कोटी २१ लाख रुपये खर्चून बांधलेल्या सिल्लोड–भोकरदन–धाड राष्ट्रीय महामार्गावर अल्पावधीतच मोठ्या प्रमाणात भेगा पडल्याने वाहनचालकांची सुरक्षा धोक्यात आली आहे. पावसाळ्यात या भेगांमध्ये पाणी साचत असून याचा अंदाज न आल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. यामुळे दररोज हजारो प्रवाशांना जीव मुठीत धरून या मार्गावरून प्रवास करत आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार) भोकरदन तालुकाध्यक्ष प्रा. डॉ. अंकुश जाधव यांनी सिल्लोडचे आमदार तथा माजी मंत्री अब्दुल सत्तार यांची भेट घेऊन संपूर्ण कामाची उच्चस्तरीय चौकशी करत दोषींवर कारवाई करावी व तातडीने रस्ता दुरुस्ती करण्याची मागणी केली होती. सिल्लोड–भोकरदन–धाड व धाड–भोकरदन या ५४.५० किलोमीटर लांबीच्या प्रकल्पामध्ये अनेक ठिकाणी सिमेंट काँक्रीट रस्त्याला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या आहेत.

# सुनिर्मल फाऊंडेशनकडून धारावीतील १०० हून अधिक गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**मुंबई । प्रतिनिधी**

शिक्षण हेच खरे सामर्थ्य आहे या उद्देशाने रविवार दिनांक ०२ ऑगस्ट २०२६रोजी सायंकाळी गणेश विद्यालय, धारावी येथे सुनिर्मल फाऊंडेशन, धारावी यांच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते तथा संत कक्कय्या विकास संस्थेचे सचिव राजेश खंदारे, ज्येष्ठ पत्रकार शशिकांत सावंत, ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. प्रा. जे. आर. केळुसकर, ॲड. सुनील शिर्के, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. रेवती आळवे, सामाजिक कार्यकर्त्या श्रद्धा तेंडुलकर, संपादक दिलीप शेडगे, सामाजिक कार्यकर्ते दिलीप गाडेकर, सामाजिक कार्यकर्ते गिरीराज शेरखाने, शब्दश्री विलास देवळेकर आणि सुनिर्मल फाऊंडेशनचे कार्यप्रमुख दत्ता खंदारे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शब्दश्री विलास देवळेकर यांनी त्यांच्या ''म्युझिकल इको'' साऊंड सिस्टीमधून सादर




केलेल्या ''विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप'' आणि जागतिक मैत्री दिनानिमित्त ''मैत्री दिनाची कविता'' या गीतांनी झाली. त्याला उपस्थित विद्यार्थी आणि मान्यवरांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. डॉ. प्रा. जे. आर. केळुसकर म्हणाले की, शिक्षण हेच जीवनातील सर्वात मोठे शस्त्र आहे. शालेय साहित्याबरोबरच चिकाटी आणि स्वाध्यायाची जोड दिली तर कोणतेही ध्येय अशक्य नाही. ज्येष्ठ पत्रकार शशिकांत सावंत यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्याचे आवाहन करत मोबाईलपेक्षा पुस्तकांशी मैत्री करा, कारण पुस्तके तुम्हाला मोठे स्वप्न दाखवतील असे सांगितले. ॲड. सुनील शिर्के यांनी विद्यार्थ्यांना कायद्याचे भान ठेवून जबाबदार नागरिक बनण्याचा संदेश दिला. तर राजेश खंदारे यांनी संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देण्याचे आश्वासन दिले. सुनिर्मल फाऊंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करीत आहे. यावर्षीही फाऊंडेशनने १०० हून अधिक विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन, कंपास बॉक्स आदी साहित्याचे वाटप केले. सुनिर्मल फाऊंडेशनने असेच सामाजिक कार्य सुरू ठेवावे, अशी अपेक्षा उपस्थित पाहुण्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी सुनिर्मल फाऊंडेशनचे संस्थापक सदस्य तसेच साप्ताहिक भगवे वादळचे संपादक दत्ता खंदारे यांचा कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भावेश खंदारे, मंगेश गायकवाड, परशुराम गजाकोष, पूर्वा खंदारे, राम म्हस्के, मनोहर कदम, विशाल नारायणे तसेच धारावी पोलीस पंचायत बिट क्र.२चे सर्व सभासद उपस्थित होते.

# प्रवीण टाके छत्रपती संभाजीनगरच्या माहिती उपसंचालक पदावर रूजू

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**



माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी सोमवारी छत्रपती संभाजीनगर विभागाचे माहिती उपसंचालक या पदाचा कार्यभार स्वीकारला.

प्रवीण टाके यापूर्वी कोल्हापूर येथे उपसंचालक म्हणून कार्यरत होते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात २००८ ला रुजू झाल्यानंतर त्यांनी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम केले आहे. त्यानंतर मुंबई मंत्रालयात वरिष्ठ सहायक संचालक असताना ‘लोकराज्य’चे ते कार्यकारी संपादक होते. चंद्रपूर, नागपूर व नांदेड याठिकाणी त्यांनी जिल्हा माहिती अधिकारी पदावर कार्य केले आहे. शासन सेवेत केलेल्या उल्लेखनीय कामासाठी त्यांना सन २०१९ - २० वर्षाचा यशवंतराव चव्हाण उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे. पत्रकारितेतील स्नातकोत्तर पदवी प्राप्त असलेले प्रवीण टाके यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा स्व.वसंतराव ओगले पुरस्कार प्राप्त आहे. शासनात येण्यापूर्वी त्यांनी जवळपास १४ वर्ष नागपूर पत्रिका, तरुण भारत, सामना आणि लोकमत वृत्तपत्रात विविध पदावर कार्य केले आहे. त्यांची फकीर ही चरित्र कादंबरी प्रकाशित झाली आहे. वऱ्हाडी भाषेतील स्तंभकार, कवी, लेखक म्हणून त्यांची ओळख असून विविध सामाजिक विषयावर त्यांनी विपुल लेखन केले आहे. आज विभागीय माहिती कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी येथील जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने अधिकारी,कर्मचा-यांनी त्यांचे स्वागत केले.

# वारकरी संप्रदायाचे विचार आणि संतांचा आचार अंगीकारल्यास भारत विश्वगुरू होईल - ना. रावसाहेब दानवे

**जाफराबाद - प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायाने आणि संतमहात्म्यांनी समाजाला दिलेले विचार, संस्कार आणि आचार प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात व व्यवहारात अंगीकारले, तर भारताला पुन्हा विश्वगुरू बनण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही, असे प्रतिपादन माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले.

कुंभारझरी येथे ह.भ.प. सोनुने गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठान, कुंभारझरी यांच्या आयोजित भव्य सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी प्रतिष्ठानच्या स्वग्राम ते श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेल्या निर्मल दिंडी पुरस्कार २०२६ मध्ये द्वितीय क्रमांकाचा मान मिळाल्याबद्दल ह.भ.प. सोनुने गुरुजी यांचा गावकऱ्यांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

ही दिंडी संपूर्ण वारीदरम्यान स्वच्छता, शिस्त, नियोजन आणि आदर्श व्यवस्थापन जपत मार्गक्रमण करत असल्याने तिला निर्मल दिंडी पुरस्कार २०२६ मध्ये द्वितीय क्रमांकाचा बहुमान प्राप्त झाला. स्वच्छता व शिस्तप्रिय दिंडी म्हणून या दिंडीची राज्यस्तरावर दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी फिरती संकष्ट चतुर्थी निमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने भाविक, वारकरी, ग्रामस्थ व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. रावसाहेब पाटील दानवे यांनी ह.भ.प. सोनुने गुरुजी यांना शाल, श्रीफळ देऊन गौरव केला. वारकरी परंपरेचे जतन, संवर्धन तसेच सामाजिक प्रबोधनासाठी त्यांच्या माध्यमातून होत असलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. पुढे बोलताना दानवे म्हणाले की, वारकरी संप्रदाय हा केवळ धार्मिक परंपरा नसून समाजाला समता, बंधुभाव, सेवा, संयम, स्वच्छता आणि सदाचाराची शिकवण देणारी जीवनशैली आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत गाडगे महाराज आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांसारख्या संतांनी दिलेला संदेश आजही समाजाला दिशा देणारा आहे. हा विचार प्रत्येकाच्या आचरणात उतरल्यास देश अधिक सुसंस्कृत, सक्षम आणि जगासाठी आदर्श ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सत्कार सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# किशोर कुमार : चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज जन्मदिन. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे.

राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या.

असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# लांजा तालुका तेली समाजातील गुणवंतांचा गौरव सोहळा संपन्न

लांजा ३.( महादेव गोळवसकर) लांजा तालुक्यातील १० वी १२ आणि विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आणि सन्मान सोहळा काल, रविवार, दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता लांजा येथील प्रा.मधु दंडवते सभागृहात संपन्न झाला.यावेळी, रत्नागिरी जिल्हा तेली समाज अध्यक्ष श्री रघुवीर शेलार, सेवा निवृत्त गट शिक्षणाधिकारी चंद्रकांत पावसकर

विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.लांजा तालुका तेली समाज सेवा संघ आणि लांजा तालुका युवा तेली समाज सेवा संघाच्या संयुक्त विद्यमाने गुण गौरव सोहळा व सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.विद्धार्थी , पालक, तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित




होते.लांजा नगरपंचायत उप नगराध्यक्ष मिलिंद लांजेकर,नगरसेविका श्रीमती प्रणाली तेली उपस्थित होते.लांजा तालुक्यातील प्रत्येक गावातील शासकीय, निमशासकीय अधिकारी , पोलिस पाटील, ग्रामसेवक, सरपंच,उप सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, जेष्ठ तेली समाज बंधु - भगिनी उपस्थित होते.कोकण स्नेही चे संपादक सुरेश पडळकर मुंबईहून खास कोकणात समारंभाला आले होते.सन्मान सोहळ्यात प्रकाश लांजेकर, अध्यक्ष , लांजा तालुका तेली समाज सेवा संघ, संदीप चव्हाण अध्यक्ष लांजा तालुका युवा तेली समाज, विठोबा लांजेकर गावकार, महादेव गोळवसकर वृत्तपत्र लेखक, चंद्रकांत पावसकर, सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी, सुरेश पडळकर संपादक कोकण स्नेही , रघुवीर शेलार अध्यक्ष, रत्नागिरी जिल्हा तेली समाज सेवा संघ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश लांजेकर, राजेश लांजेकर, गुरूप्रसाद तेली, रामचंद्र लांजेकर,रोहन पावसकर, संदिप चव्हाण,अमोल शेलार, ओंकार लांजेकर , महेश लांजेकर, दिपक साळुंके, सुधाकर लांजेकर ,सागर जावडेकर इत्यादी पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

कार्यक्रमास, विद्यार्थी ,महिला व पुरुष, हितचिंतक, तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संदिप चव्हाण यांनी केले तर आभार प्रकाश लांजेकर यांनी मानले.उपस्थितांकरिता भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

**महादेव गोळवसकर**
**लांजा,**
**९८६९४७६२०९**

# आष्टी येथे बँक ऑफ महाराष्ट्र शाखेसमोर शेतकरी, व्यापारी व नागरिकांचे आमरण उपोषण; शाखा तात्काळ सुरु करण्याची जोरदार मागणी

**आष्टी - प्रतिनिधी**

बँक ऑफ महाराष्ट्रच्या आष्टी शाखेचा कथित मनमानी कारभार, ग्राहकांशी होत असलेली अयोग्य वागणूक आणि मागील चार दिवसांपासून शाखा बंद असल्यामुळे निर्माण झालेल्या गैरसोयीच्या निषेधार्थ आज सकाळी ९ वाजल्यापासून आष्टी परिसरातील शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व विविध संघटनांचे पदाधिकारी यांनी शाखेसमोर आमरण उपोषणास सुरुवात केली.

आंदोलकांनी सांगितले की, शाखा बंद असल्यामुळे पीककर्ज, व्यापारी कर्ज, शासकीय योजनांचे व्यवहार, खाते व्यवहार तसेच इतर दैनंदिन बँकिंग सेवा पूर्णपणे ठप्प झाल्या आहेत. त्यामुळे शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होत असून संतापाची लाट निर्माण झाली आहे.

उपोषणकर्त्यांनी बँक प्रशासनावर ग्राहकांशी उद्धट वागणूक देणे, आवश्यक माहिती न देणे, कामकाजात विलंब करणे आणि शेतकरी व व्यापाऱ्यांची अडवणूक केल्याचा आरोप केला. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून शाखेचे कामकाज पूर्ववत सुरू करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. आंदोलनाच्या ठिकाणी लावलेल्या फलकावर प्रमुख मागण्यांमध्ये ग्राहकांशी नम्र वागणूक, कामकाजात तत्परता, अधिकारी व कर्मचाऱ्यांवर योग्य कारवाई, पीककर्ज व इतर सर्व प्रकारची कर्जे तात्काळ मंजूर करणे, व्यापाऱ्यांना वेळेवर कर्ज उपलब्ध करून देणे, पीककर्ज विम्याचा लाभ शेतकऱ्यांना त्वरित मिळवून देणे, आरबीआयच्या नियमांनुसार बँकेचे कामकाज सुरू करणे तसेच बँकेचा कथित मनमानी व भ्रष्ट कारभार थांबविणे या मागण्यांचा समावेश आहे. उपोषणकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, बँक शाखा पूर्ववत सुरू होत नाही आणि संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई होत नाही, तोपर्यंत आमरण उपोषण मागे घेतले जाणार नाही. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रश्न सोडवावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

# मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी श्याम लोया यांची बिनविरोध निवड

**जालना - प्रतिनिधी**

मराठवाड्यातील व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रातील अग्रगण्य संस्था मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सच्या २०२६-२८ या कार्यकाळासाठी नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल येथे झालेल्या सर्वसाधारण सभेत जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्यकारी सचिव श्याम लोया यांची वरिष्ठ उपाध्यक्ष, तर संजय दाड यांची सहसचिवपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. विशेष म्हणजे, जालना जिल्ह्यातून स्वर्गीय किशोरशेठ अग्रवाल यांच्यानंतर वरिष्ठ उपाध्यक्षपदाचा मान मिळविण्याचा बहुमान श्याम लोया यांना प्राप्त झाला आहे. तसेच चेंबरच्या अध्यक्षपदी सुरेंद्र रेदासणी आणि महासचिवपदी संदीप लाहोटी यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेच्या सर्व पदांवरील निवड एकमताने झाल्यामुळे चेंबरमधील संघटनात्मक एकोपा, परस्पर विश्वास आणि लोकशाही परंपरा पुन्हा अधोरेखित झाली. महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष मानसिंह बापू पवार, सत्यनारायण लाहोटी, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष प्रफुल्ल मालानी, तनसुखभाई झांबड तसेच मराठवाडा चेंबरचे अध्यक्ष आदेशपालसिंग छाबडा यांच्या मार्गदर्शनाखाली सभा पार पडली. ॲड. कांबळे यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली. उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छांचा वर्षाव केला. व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रातूनही या नव्या कार्यकारिणीचे स्वागत करण्यात आले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्यातील व्यापारी वर्गाच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे न्याय मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# प्रवासी वाहन चालकांसाठी आनंदाची बातमी; ‘धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळ’ योजनेत नोंदणीचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

राज्यातील ऑटो-रिक्षा, टॅक्सी, कॅब तसेच इतर प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षेसाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पूर्वीच्या ‘धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो-रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळा’चे नाव बदलून आता ‘धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळ’ असे करण्यात आले असून, मंडळाच्या नियमावलीतही महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत.

या सुधारित योजनेमुळे मंडळाच्या सदस्यत्वाची व्याप्ती वाढली असून, आता परवानाधारक बॅजधारक सर्व प्रकारच्या प्रवासी वाहन चालकांना या मंडळाचे सदस्य होता येणार आहे. त्यामुळे राज्यातील अधिकाधिक चालकांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

शासनाच्या निर्णयानुसार प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत चालकांच्या सामाजिक आणि आर्थिक सुरक्षेसाठी स्वतंत्र कल्याणकारी निधी निर्माण करण्यात येणार आहे.

या निधीतून पात्र नोंदणीकृत चालकांना विविध शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला जाणार आहे. तसेच , आणि तत्सम ऑनलाइन ॲप किंवा ॲग्रीगेटरच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक बुकिंग करणाऱ्या कंपन्यांकडून शासनाने निश्चित केलेल्या तरतुदीनुसार प्रत्येक राईडवर आकारण्यात येणारी कल्याणकारी रक्कम या निधीत जमा होणार असून, त्याचा उपयोग चालकांच्या हितासाठी केला जाणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र चालकांनी मंडळाकडे नोंदणी करणे अनिवार्य आहे. नोंदणीसाठी ५०० रुपये नोंदणी शुल्क भरून विहित नमुन्यात अर्ज सादर करावा लागणार आहे. नोंदणीसाठी चालकांकडे आधार कार्ड, पॅन कार्ड, वैध वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), प्रवासी वाहन चालविण्यासाठी आवश्यक बॅजची माहिती तसेच अर्जामध्ये मागविण्यात आलेली इतर आवश्यक कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित चालकाला मंडळाचे ओळखपत्र ( ) दिले जाणार असून, त्याच्या आधारे शासनामार्फत आणि मंडळाकडून भविष्यात राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणार आहे.

**जालना जिल्ह्यातील चालकांना विशेष आवाहन**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना यांनी जिल्ह्यातील ऑटो-रिक्षा, टॅक्सी, कॅब तसेच इतर सर्व पात्र प्रवासी वाहन चालकांना या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः , व इतर ऑनलाइन प्रवासी वाहतूक सेवांशी संलग्न असलेल्या चालकांनी आवश्यक कागदपत्रांसह तातडीने नोंदणी करून शासनाच्या या महत्त्वाकांक्षी कल्याणकारी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांनी केले आहे.

# धर्म, शील आणि संयमाचे रक्षण करणाऱ्यालाच खरा विजय लाभतो : महासती निर्मलाजी म.सा.

**जालना । प्रतिनिधी :**
संकटाच्या काळात धर्म, शील आणि संयमाचा त्याग न करता विवेकाने मार्गक्रमण करणाऱ्यालाच जीवनात खरा विजय प्राप्त होतो, असे प्रतिपादन तपकौमुदी उपप्रवर्तिनी महासती निर्मलाजी म.सा. यांनी धर्मसभेत केले. धर्म हा केवळ पूजा-अर्चा किंवा धार्मिक विधींमध्ये मर्यादित नसून तो प्रत्येकाच्या विचार, आचरण आणि निर्णयांमध्ये प्रतिबिंबित झाला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.


छायाचित्र : दर्पण जैन

प्रवचनात त्यांनी स्पष्ट केले की, लोभ, मोह, अहंकार आणि स्वार्थ या दुर्गुणांमुळे मनुष्य विवेक गमावतो आणि चुकीच्या निर्णयांकडे प्रवृत्त होतो. क्षणिक सुखाच्या मोहात घेतलेले निर्णय अनेकदा आयुष्यभर दुःख आणि पश्चात्तापाचे कारण ठरतात. त्यामुळे प्रत्येकाने आत्मसंयम, करुणा आणि सद्सद्विवेकबुद्धी जोपासून धर्ममूल्यांनुसार जीवन जगावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी त्यांनी एका धर्मनिष्ठ महाराणीचा प्रेरणादायी प्रसंग सांगितला.

सतीत्व आणि धर्मरक्षणावर संकट ओढवले असताना महाराणीने भीती न बाळगता धैर्य, संयम आणि बुद्धिमत्तेच्या बळावर परिस्थितीचा सामना केला. धर्माशी कोणतीही तडजोड न करता विवेकपूर्ण निर्णय घेतल्यामुळे संकटाचे रूपांतर विजयात झाले. अढळ श्रद्धा, दृढनिश्चय आणि शुद्ध आचरण असलेल्या व्यक्तीला परमात्म्याची कृपा निश्चितच लाभते, असा संदेश त्यांनी या प्रसंगातून दिला. महासती निर्मलाजी म.सा. म्हणाल्या की, वासना आणि अहंकाराच्या आहारी गेलेला मनुष्य मदमस्त हत्तीप्रमाणे स्वतःच्याच विनाशाला कारणीभूत ठरतो. म्हणून मन, वचन आणि काया यांवर संयम ठेवणे हीच खरी साधना आहे.

बाह्य शत्रूंवर विजय मिळवण्यापेक्षा स्वतःच्या विकारांवर विजय मिळवणे अधिक महत्त्वाचे असून त्यातूनच आत्मशांती आणि आत्मोन्नतीचा मार्ग खुला होतो.

त्या पुढे म्हणाल्या की, क्षमा ही दुर्बलतेचे नव्हे तर अंतःकरणाच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. अन्याय करणाऱ्याविषयीही द्वेष न बाळगता समता, करुणा आणि सद्भावनेचा स्वीकार करणारा व्यक्तीच धर्माचे खरे पालन करतो.

समाजात शांतता, बंधुभाव आणि सौहार्द टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येकाने या मूल्यांचे जतन करणे आवश्यक आहे.

प्रवचनाच्या शेवटी त्यांनी उपस्थितांना सत्य, अहिंसा, संयम, सदाचार आणि गुरूंच्या शिकवणीचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. शरीर, संपत्ती, मान-सन्मान आणि वैभव हे क्षणभंगुर असले तरी धर्माने कमावलेले संस्कार, सद्गुण आणि शुभकर्म हेच जीवाचे खरे वैभव असून त्यातूनच आत्मकल्याण आणि मोक्षप्राप्तीचा मार्ग प्रशस्त होतो, असे त्यांनी सांगितले.

भारतीय सैन्य दलातील सेवापूर्ती निमित्त भव्य मिरवणूक....

## देशभक्तीच्या जयघोषात नागरी सत्कार, संपूर्ण परिसर राष्ट्रप्रेमाने दुमदुमला

**जाफराबाद - प्रतिनिधी**
भारतीय सैन्य दलात तब्बल १७ वर्षे मातृभूमीच्या रक्षणासाठी कर्तव्य बजावून सेवापूर्ती केलेले मनोहर उत्तमराव पा. फुकट यांच्या गौरवार्थ आयोजित नागरी सत्कार सोहळ्याने संपूर्ण परिसर भारावून गेला. हा केवळ एका सैनिकाचा सत्कार नव्हता, तर राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या प्रत्येक जवानाप्रती व्यक्त झालेली सामूहिक कृतज्ञता होती. जाफराबाद येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून प्रारंभ झालेल्या भव्य मिरवणुकीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, अहिल्याबाई होळकर चौक,साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे चौकापर्यंत देशभक्तीचे अविस्मरणीय वातावरण निर्माण केले. तिरंग्यांनी सजलेले रस्ते, देशभक्तीपर गीत, ढोल-ताशांचा गजर, भारतमातेच्या जयघोषांनी आणि सैनिकांच्या गौरवगीतांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले. नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत फुलांची उधळण करून स्वागत करण्यात आले. यानंतर मनोहर फुकट यांचे जन्मगाव आरदखेडा येथे त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. गावाच्या प्रवेशद्वारापासूनच नागरिकांनी पुष्पवृष्टी, औक्षण आणि घोषणांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. गावातून निघालेली भव्य मिरवणूक म्हणजे एका सैनिकाविषयीचा ग्रामस्थांचा अभिमान आणि प्रेम यांचे जिवंत दर्शन होते. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या प्रांगणात आयोजित मुख्य सत्कार सोहळ्यात शाल, श्रीफळ, पुष्पहार आणि सन्मानचिन्ह प्रदान करून मनोहर फुकट यांचा यथोचित गौरव करण्यात आला. उपस्थितांनी उभे राहून टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या राष्ट्रसेवेचा सन्मान केला.

## अर्णव अग्रवालची उत्तुंग भरारी; बिट्स पिलानीमध्ये निवड

**जालना । प्रतिनिधी**
अर्णव आशिष अग्रवाल याने आपल्या उल्लेखनीय शैक्षणिक गुणवत्तेच्या जोरावर भारतातील अग्रगण्य उच्च शिक्षण संस्थांपैकी एक असलेल्या बिट्स पिलानीमध्ये प्रवेश मिळवला आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे तो विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरला आहे.



अर्णव हा जालना येथील ज्येष्ठ रोटेरियन सुरेश विठ्ठलदास अग्रवाल यांचा नातू आहे. त्याने जेईई मेन परीक्षेत ९९.५८ पर्सेंटाइल, एमएच-सीईटीमध्ये ९९.९६९ पर्सेंटाइल तसेच बिटसॅट मध्ये उत्कृष्ट गुण मिळवून हे यश संपादन केले आहे. यापूर्वी त्याने सीबीएसई दहावीच्या परीक्षेत ९७.३३% गुण मिळवून आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची चमक दाखवली होती. अर्णवची आता बिट्स पिलानीमध्ये निवड झाली असून, त्याच्या शैक्षणिक प्रवासातील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्याचे अभिनंदन होत असून, उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## जालन्यात मोहम्मद रफी व किशोर कुमार यांना सुरेल गीतांजली; स्थानिक कलावंतांच्या बहारदार सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध

*मराठवाडा ऑटो रिक्षा युनियन व हिंद बॉईज ग्रुपचा उपक्रम*

**जालना । प्रतिनिधी**
हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या ४६ व्या स्मृतिदिनानिमित्त तसेच महान पार्श्वगायक, अभिनेते व संगीतकार किशोर कुमार यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त जालना येथे सुरेल गीतांची अविस्मरणीय मैफल रंगली. मराठवाडा ऑटो रिक्षा युनियन व हिंद बॉईज ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला गीतांजली हा संगीत कार्यक्रम स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात मोठ्या उत्साहात व रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी मोहम्मद रफी आणि किशोर कुमार यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नगरसेवक रहीम शेठ सगीर पहेलवान, भजनसम्राट संजय शहाणे, वे. शा. स. गणेश मांडे महाराज आणि डॉ. रवींद्र देशपांडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी रफी आणि किशोर कुमार यांच्या संगीत क्षेत्रातील अतुलनीय योगदानाचा गौरव करत त्यांच्या गीतांनी अनेक पिढ्यांच्या मनावर अधिराज्य गाजविल्याचे सांगितले.

यानंतर स्थानिक गायक-गायिकांनी दोन्ही दिग्गज गायकांची अजरामर गीते आपल्या सुरेल आवाजात सादर करत सभागृहातील वातावरण संगीतमय केले. शिवकुमार ठाकूर, भास्कर खरात, शेख अकबर, चंद्रकांत कुलकर्णी, सय्यद रहीम, तय्यबभाई, एल. के. कुरेशी, अक्रम बाबा, रत्नाकर देशपांडे तसेच कल्पना पाटील यांनी रफी आणि किशोर कुमार यांच्या लोकप्रिय गीतांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. प्रत्येक गाण्यानंतर उपस्थित संगीतप्रेमींनी टाळ्यांच्या कडकडाटात कलाकारांचे भरभरून कौतुक केले. अनेक रसिकांनी जुन्या आठवणींना उजाळा देत गीतांचा मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमात सादर झालेल्या मधुर गीतांनी सभागृहातील वातावरण भारावून गेले.

जुन्या हिंदी चित्रपटसृष्टीतील सुवर्णकाळातील गाण्यांनी उपस्थितांच्या मनात आठवणींचा जागर केला. कलाकारांच्या भावपूर्ण गायनामुळे अनेक गीतांना रसिकांनीही स्वरांची साथ दिली. त्यामुळे कार्यक्रमाला एका कौटुंबिक संगीत मैफलीचे स्वरूप प्राप्त झाले.

## गेल्या २२ वर्षांपासून लक्कडकोट ते शिर्डी साईबाबा पायी दंडी यात्रा व दिव्यांग व अनाथ मुलांना अन्नदान वाटप

**जालना । प्रतिनिधी**
आयोजक गुलाबराव राजगिरे यांच्या वतीने रविवार दि.२ ऑगस्ट २०२६ रोजी दिव्यांग व अनाथ मुलांसाठी दालबाटी, शिरा व भाताचे अन्नदान करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाला लाभार्थ्यांसह उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी समाजसेवक डॉ.रामकृष्ण भोंडोने, मोरे साहेब, संजय कांबळे तसेच अपंग विद्यालयाचे शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. अन्नदानानंतर लक्कडकोट येथे श्री साईबाबींची आरती करून भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

गुलाबराव राजगिरे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २२ वर्षांपासून लक्कडकोट संभाजीनगर येथून शिर्डी साईबाबा पायी दिंडी काढण्याची परंपरा अखंडपणे सुरू आहे. दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने सुमारे २०० महिला व पुरूष भाविक या पायी दिडींत सहभागी होऊन साईबाबांप्रती आपली श्रद्धा व्यक्त करतात. सामाजिक बांधीलकी आणि धार्मिक परंपरेचा सुंदर संगम या उपक्रमातून दिसून येतो.

## कलश स्थापनेने चातुर्मास सोहळ्यास प्रारंभ; सकल जैन समाज बांधवांची मोठी उपस्थिती

### अनेक जन्मांच्या पुण्योदयानेच कलश स्थापनेचे भाग्य प्राप्त होते-पवित्रसागरजी महाराज

**जालना- प्रतिनिधी**
प. पू. आचार्य श्री १०८ पवित्रसागरजी महाराज ससंघ यांच्या पावन सान्निध्यात आयोजित जालना चातुर्मास अंतर्गत भव्य मंगल कलश स्थापना सोहळा अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात रविवार दि. २ ऑगस्ट रोजी गणेश भवन येथे संपन्न झाला. जालना शहरासह परिसरातील हजारो जैन भाविकांनी उपस्थित राहून धर्मलाभ घेतला.



यावेळी आचार्य श्री पवित्रसागरजी महाराज यांनी कलश स्थापनेचे आध्यात्मिक व धार्मिक महत्त्व विशद करताना सांगितले की, कलश हे केवळ एक पात्र नसून मंगल, समृद्धी, पावित्र्य, धर्म आणि आत्मकल्याणाचे प्रतीक आहे. अशा पुण्यप्रद कलश स्थापनेचे भाग्य अनेक जन्मांच्या पुण्योदयानेच प्राप्त होते.

यावेळी प. पू. मुनिश्री १०८ प्रशांतसागरजी महाराज व मुनिश्री १०८ प्रभावसागरजी महाराज यांनी धर्म, त्याग, संयम आणि गुरुभक्तीचा संदेश देत सर्वांना आध्यात्मिक जीवनाचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले. यानंतर विविध पुण्यकलशांच्या मंगल बोली मोठ्या उत्साहात *(पान २ वर)*

## मुंबई उच्च न्यायालयाचे कचरा व्यवस्थापनावर गंभीर निरीक्षण; जालना महानगरपालिकेनेही लक्ष द्यावे - ॲड. महेश धन्नावत

**मुंबई - प्रतिनिधी**
मुंबई उच्च न्यायालयाने सार्वजनिक ठिकाणी कचरा आणि प्लास्टिक कचरा बेजबाबदारपणे टाकण्याच्या नागरिकांच्या कृतीवर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. न्यायालयाने कन्नमवार को-ऑप. हाउसिंग सोसायटी असोसिएशन लि. विरुद्ध भारत सरकार रिट याचिका क्रमांक ७९० सन २०१८ मध्ये नमूद केले की, अशा वर्तनामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे आणि महानगरपालिकेच्या यंत्रणेवर अनावश्यक दबाव येत आहे. न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित एका रिट याचिकेवर सुनावणी करताना ही निरीक्षणे नोंदवली. न्यायालयाने म्हटले आहे की, नागरिकांनी नागरी शिस्त पाळणे आवश्यक आहे, जी समाजाप्रती प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे आणि पर्यावरण संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. मुंबईतील लोक सार्वजनिक रस्त्यांवर किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्यास मोकळे आहेत, परंतु तेच लोक परदेशात गेल्यावर असे करत नाहीत, कारण तेथे महानगरपालिकेच्या कायद्यांची अंमलबजाई कठोर असते.

सुनावणीदरम्यान, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सॉलिड वेस्ट (मॅनेजमेंट अँड हँडलिंग) क्लीनलीनेस अँड सॅनिटेशन बाय-लॉज फॉर २०२५ सादर केले. या नियमांचे परीक्षण करताना, न्यायालयाने निरीक्षण केले की वैधानिक चौकट असूनही, समुद्रात फेकलेला प्लास्टिक/कचरा मान्सूनमध्ये परत किनाऱ्यावर येत असल्याने समुद्रकिनारे आणि किनारे अजूनही मोठ्या प्रमाणात प्रभावित आहेत. न्यायालयाने म्हटले की, वॉर्ड अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे की प्रत्येक वॉर्ड सार्वजनिक रस्ते, पदपथ, नद्या, नाले आणि इतर जलस्रोतांवर टाकलेल्या कचऱ्यापासून मुक्त राहील. उघडे महानगरपालिकेचे नाले प्लास्टिक कचरा टाकण्याचे ठिकाण बनले आहेत, जो शेवटी समुद्रात जातो. जलस्रोतांमध्ये आणि नाल्यांमध्ये प्लास्टिक कचरा टाकण्याची ही समस्या इतक्या मोठ्या प्रमाणावर कशी सुरू राहू शकते, हे आश्चर्यकारक आहे. न्यायालयाने नागरिकांना स्वतःला शिस्त लावण्याची वेळ आली असल्याचे अधोरेखित केले. नागरिकांच्या या बेफिकीर वृत्तीमुळे पर्यावरणाचे गंभीर नुकसान होत आहे आणि महानगरपालिकेच्या यंत्रणेवर अनावश्यक दबाव येत आहे. न्यायालयाने असेही नमूद केले की, तळागाळात बदल केल्याशिवाय अपेक्षित परिणाम साधणे कठीण आहे. त्यामुळे, न्यायालयाने , बृहन्मुंबई महानगरपालिके ला प्रत्येक वॉर्डात आठवड्याच्या निश्चित दिवशी पथके पाठवून नागरिकांना नागरी आरोग्य आणि स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्याचे आणि सार्वजनिक रस्ते, पदपथ, जलस्रोत, नाले आणि इतर सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याविरुद्ध नागरी संस्कृती आणि शिस्त लावण्याचे निर्देश दिले.

उच्च न्यायालयाने रहिवाशांच्या कचरा उघड्यावर न टाकण्याच्या कर्तव्यावर भर दिला आणि वॉर्ड अधिकाऱ्यांना कॅमेरे आणि इतर तांत्रिक उपायांच्या मदतीने अशा गुन्हेगारांना ओळखण्याचे आणि त्यांच्याविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्याचे निर्देश दिले, ज्यात केवळ दंड आकारणेच नव्हे, तर सार्वजनिक उपद्रव निर्माण केल्याबद्दल फौजदारी कारवाई सुरू करणे देखील समाविष्ट आहे. खंडपीठाने असेही निरीक्षण केले की, एखादा परिसर अधिसूचित झोपडपट्टी असला किंवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अखत्यारीत येत असला तरी सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता राखण्याची जबाबदारी टाळता येणार नाही.

या संदर्भात, ॲड. महेश धन्नावत यांनी म्हटले आहे की, मुंबई उच्च न्यायालयाच्या या आदेशाच्या पार्श्वभूमीवर, जालना महानगरपालिकेने देखील शहरात कोणतेही कचरा टाकण्याचे ठिकाण (डंपिंग ग्राउंड) अस्तित्वात नाही आणि कोणतेही ड्रेनेज अडकलेले नाही याची खात्री करावी. न्यायालयाने निरीक्षण केले की, ''केवळ झोपडपट्ट्यांमध्ये राहतात म्हणून लोकांचा समूह मोठ्या प्रमाणावर समाजाला प्रतिकूल परिणाम करणारा उपद्रव करत राहू शकतो, असा कोणताही नियम नाही. आरोग्य आणि स्वच्छता, खरं तर, झोपडपट्ट्यांमध्ये अधिक महत्त्वाची आहे. तथापि, समाजाच्या मूलभूत गरजेची जाणीव का नाही हे आम्हाला समजत नाही. झोपडपट्ट्यांना केवळ व्होट बँक म्हणून पाहिले जाऊ शकत नाही; त्याऐवजी, त्यांचे सर्वांगीण कल्याण साधले पाहिजे.''

न्यायालयाने पुढे असेही म्हटले की, संबंधित प्रदेशांच्या अतिरिक्त महानगरपालिका आयुक्तांवर सर्व आघाड्यांवर सार्वजनिक स्वच्छता राखण्याच्या संदर्भात वॉर्डांवर कठोर नजर ठेवण्याची जबाबदारी आहे. न्यायालयाने अधोरेखित केले की, देशभरातील विविध महानगरपालिका आरोग्य आणि स्वच्छता राखण्यासाठी प्रयत्न करत असताना त्याच्या निर्देशांना अधिक महत्त्व प्राप्त होते. मध्य प्रदेशातील इंदूर शहराला केंद्र सरकारने (गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय) देशातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून मान्यता दिली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने कडे असलेल्या संसाधनांच्या विपुलतेसह अशी स्थिती प्राप्त करणे कठीण नाही, जर नागरिकांच्या सहकार्याने आणि घनकचरा व्यवस्थापन नियम आणि तिने तयार केलेल्या उपनियमांची प्रभावीपणे आणि कठोरपणे अंमलबजावणी करून अशी उद्दिष्टे साध्य करण्याची इच्छा असेल तर. न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने ला प्रत्येक वॉर्डात स्वच्छता सुनिश्चित करण्यासाठी वॉर्ड अधिकाऱ्यांसाठी एक व्यापक योजना/योजना तयार करण्याचे निर्देश दिले. सामाजिक माध्यमांचा वापर करण्याची आणि वॉर्डनिहाय तक्रार निवारण कक्ष/मोबाइल ॲप स्थापित करण्याची सूचना केली, ज्याद्वारे परिसरातील नागरिक त्यांच्या तक्रारी सामायिक करू शकतील. त्यानुसार, न्यायालयाने महानगरपालिका आयुक्तांना सर्व वॉर्डांमध्ये पद्धतशीर कचरा संकलन सुनिश्चित करण्याचे, बेकायदेशीर कचरा टाकण्यावर कठोर नजर ठेवण्याचे, गुन्हेगारांना ओळखण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे आणि इतर तंत्रज्ञान तैनात करण्याचे, सार्वजनिक रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई सुरू करण्याचे, प्लास्टिक कचरा समुद्रात जाण्यापासून रोखण्यासाठी यंत्रणा तयार करण्याचे, उघड्या नाल्यांचे पाईप ड्रेनमध्ये रूपांतर करण्याचे, स्वच्छ वॉर्डांची प्रसिद्धी करण्याचे आणि न्यायालयासमोर अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.